भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १५६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०३/२०१७

१) सरकारी कामात अडथळा निर्माण व कॉलर पकडून ओढंतान करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०३/०३/२०१७ चे ०९.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी हे लोकसेवक असुन मा. न्यायालयाच्या आदेशाने आरोपीचे घरी पतसंस्थेचे एकुण ३३०८६–/रु. ची वसुली करीता आपले स्टॉपसह गेले असता यातील आरोपीने पैसे नाहीत. असे म्हटल्यावर फिर्यादी हे जप्ती कारवाई करीत असता आरोपीने सरकारी कामात अडथळा केला. व कर्तव्यावर असलेली महीला कर्मचारी हिचे कॉलर पकडुन ओढंतान केली व अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादींचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५३,३३२,१८६,१८८,२९४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

२) हनुमान मंदीरातील मुर्तीवरील चांदीचा मुकुट चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०३/०३/२०१७ चे ११.३० ते १७.०० वा. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने हनुमान वार्ड मोठा बाजार भंडारा येथील हनुमान मंदीरातील हनुमान मुर्तीवरील चांदीचा नक्षीकाम केलेला मुकुट वजन अंदाजे १ किलो किंमती ४०,०००/–रु. चा चोरुन नेल्याने फिर्यादी अभिशेख चंद्रमनी पांन्डेय वय २७ वर्ष, रा. सहकार नगर देशबंधु वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

३) महीला मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–

दिनांक ०३/०३/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील मृतक महीला अनुराधा पतीराम वाघाये वय ४५ वर्ष, रा. केसलवाडा वाघ पोस्टे लाखनी ही मृत अवस्थेत बसस्थानक भंडारा येथे मिळुन आल्याने फिर्यादी सुनील दामोधर जिभकाटे वय ४५ वर्ष, रा. बसस्थानक भंडारा (आगार प्रमुख) यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

४) प्रकृती अचानक बिघडल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ०३/०३/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील मृतक देवराम मन्साराम ऊके वय ४० वर्ष, रा. कन्हाळगाव याची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रु.भंडारा येथे आकस्मीत विभागात नेले असता डॉ. ने तपासुन मरण पावल्याचे घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बाभरे पोस्टे आंधळगाव याचे चौकशी वरुन नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. दिक्षीत पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहे.

५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक ०३/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा व कारधा येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २९ लिटर हातभट्टी दारु किंमती ३,६३०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

04.3

(एस. व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.